**ठळक बातम्या**

- नालंदा, तक्षशीला यासारख्या महत्त्वाच्या विद्यापीठांच्या पुनरुज्जीवनाची गरज उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याकडून व्यक्त

- मणिपूरमधे ८ मार्च पासून सर्वांना मुक्तपणे वावरता येईल यासाठी आवश्यक खबरदारी घेण्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे निर्देश

- येत्या तीन महिन्यात पंजाबला अंमलीपदार्थमुक्त बनवण्याचा मुख्यमंत्री भगवंत सिंग मान यांचा निर्धार, एकाच दिवशी ८०० ठिकाणी छापे

- रमजानच्या पवित्र महिन्याला देशात उद्यापासून सुरुवात होणार

**आणि**

- चॅम्पियन्स करंडकातल्या इंग्लंड विरुद्धच्या सामन्यात दक्षिण आफ्रिका विजयाच्या उंबरठ्यावर

**<><><><><>**

भारतात एकेकाळी ज्ञानाची केंद्रं म्हणून कार्यरत असलेल्या नालंदा, तक्षशीला अशा महत्त्वाच्या विद्यापीठांचं पुनरुज्जीवन व्हायला हवं, असं आग्रही प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज केलं. मुंबईत के. पी. बी. हिंदुजा वाणिज्य महाविद्यालयाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. शिक्षण आणि तंत्रज्ञान हे समाजपरिवर्तनासाठी महत्त्वाचे घटक आहेत, असं सांगून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ग्रामीण जीवनाचा कायापालट घडवण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

कृषी क्षेत्राला आणखी लवचिक आणि समृद्ध करणं हा यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पाचा उद्देश असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. कृषी आणि ग्रामीण समृद्धी या विषयावरच्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारमध्ये ते बोलत होते. कृषिक्षेत्राला देशाच्या विकासाचं पहिलं इंजिन मानून सरकारनं शेतकऱ्यांना मानाचं स्थान दिलं आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. कृषी क्षेत्राचा विकास आणि खेड्यांची समृद्धी या दोन महत्त्वपूर्ण ध्येयांच्या दिशेनं आपण सर्वजण एकत्र वाटचाल करत आहोत, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

मणिपूरमधे येत्या ८ मार्च पासून सर्व रस्त्यांवर सर्वांना मुक्तपणे वावरता यावं याची काळजी घेण्याचे निर्देश केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज दिले. मणिपूरमधल्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी राज्यपाल अजयकुमार भल्ला यांच्या उपस्थितीत आज नवी दिल्लीत आयोजित बैठकीत ते बोलत होते. रस्त्यांवर वाहतुकीला अडथळे आणणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी तसंच मणिपूरमधल्या आंतरराष्ट्रीय सरहद्दीलगत कुंपण घालण्याचं काम लौकरात लौकर पूर्ण करावं असं त्यांनी सांगितलं. मणिपूरला अमली पदार्थांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी अमलीपदार्थ व्यापाराचं जाळं उद्ध्वस्त करणं आवश्यक आहे असं ते म्हणाले. मणिपूरमधे शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली. मणिपूरमधे राष्ट्रपती राजवट लागू झाल्यानंतर ही पहिलीच आढावा बैठक होती.

<><><><><>

येत्या तीन महिन्यात पंजाबला अंमलीपदार्थमुक्त बनवण्याचा संकल्प पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत सिंग मान यांनी केला आहे. या कालावधीत पंजाबमधून सर्व प्रकारच्या अंमली पदार्थांचं उच्चाटन करण्याचे निर्देश त्यांनी सर्व वरिष्ठ प्रशासकीय

अधिकारी आणि पोलीस अधिकाऱ्यांसमवेत घेतलेल्या बैठकीत दिले. या सर्व मोहिमांवर लक्ष ठेवण्यासाठी ५ मंत्र्यांची समितीही त्यांनी स्थापन केली आहे.

पंजाब पोलिसांच्या ८ हजार कर्मचाऱ्यांनी आज ८०० ठिकाणी छापे टाकले. या कारवाईतून पोलिसांनी २९० अंमली पदार्थांच्या तस्करांना अटक केली आणि २३० FIR दाखल केले.

**<><><><><>**

अंमलीपदार्थांच्या प्रकरणांमध्ये दोषी आढळणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचं यापुढे केवळ निलंबन न करता पोलीस सेवेतून बडतर्फ केलं जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत झालेल्या पोलीस संमेलनात बोलत होते. या संमेलनात देशात नव्यानं तयार झालेल्या तिन्ही कायद्यांच्या अंमलबजावणीचं आणि सायबर प्लॅटफॉर्मचं  सादरीकरण झालं.

**<><><><><>**

सेबीच्या अध्यक्षपदाचा कार्यभार तुहिन कांत पांडे यांनी आज मुंबईत स्वीकारला. देशाच्या नागरिकांचा, संसदेचा, सरकारचा, गुंतवणूकदारांचा आणि या क्षेत्राचा सेबीवर विश्वास आहे, असं ते यावेळी माध्यमांशी बोलताना केलं. विश्वास, पारदर्शकता, परस्परसंबंध आणि तंत्रज्ञान या चार गोष्टी समोर ठेवून सेबी काम करते आणि म्हणूनच भारतीय बाजारपेठेवर संपूर्ण जगाचं लक्ष आहे, असं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

रमझानच्या पवित्र महिन्याला देशात उद्यापासून सुरुवात होत आहे. महिनाभर रोजा अर्थात उपवास करण्याच्या महिन्याचा उद्या पहिला दिवस आहे. या संपूर्ण महिन्यात 'तराविह' ही रात्रीची विशेष प्रार्थना केली जाते. 'ईद-ऊल-फित्र' च्या माध्यमातून या महिन्याचा समारोप होतो. आखाती देशांमध्ये रमझानचा महिना आजपासून सुरु होत आहे.

<><><><>

उत्तराखंडमधल्या चमोली जिल्ह्यातल्या माना गावाजवळ काल सकाळी हिमस्खलनात अडकलेल्या कामगारांपैकी ४ जणांचा मृत्यू झाला आहे. आतापर्यंत ५० कामगारांना वाचवण्यात यश आलं असून उर्वरित ५ कामगारांना वाचवण्यासाठी पथकं शोध मोहिमेत गुंतली आहेत.

<><><><>

तेलंगणात एस एल बी सी बोगद्यात अडकलेल्या आठ कामगारांची ओळख अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पटली असल्याची माहिती तेलंगणाचे पर्यटन मंत्री जे कृष्णा राव यांनी दिली आहे. यापैकी किमान ४ कामगारांची सुटका उद्या संध्याकाळपर्यंत करण्यात यश मिळेल तर उर्वरित ४ कामगारांनाही येत्या दोन दिवसांत बाहेर काढलं जाईल, असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

दिल्लीत ३१ मार्च नंतर १५ वर्षांहून जुन्या वाहनांना पेट्रोल पंपावर इंधन न देण्याचा निर्णय दिल्ली सरकारनं घेतला आहे. अशी वाहनं शोधण्यासाठी पेट्रोल पंपावर विशेष उपकरणं लावली जात आहेत, अशी माहिती दिल्लीचे पर्यावरणमंत्री मनजिंदर सिंह सिरसा यांनी दिली. राजधानीतली वायू प्रदूषणाची पातळी कमी करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><>

चर्चेदरम्यान झालेल्या वादावादीसाठी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची माफी मागायला हवी, असं अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबीयो यांनी म्हटलं आहे. ट्रम्प यांना रशियाला वाटाघाटी करायला राजी करायचं असून रशिया - युक्रेन संघर्ष थांबवायचा आहे, असं रुबीयो म्हणाले.

व्हाईट हाऊस मधे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प, उपराष्ट्राध्यक्ष जे डी व्हॅन्स यांची युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्याशी काल रात्री झालेल्या चर्चेत शाब्दिक चकमक झडली होती. झेलेन्स्की यांच्या मनात रशियाचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर पुतीन यांच्याबद्दल द्वेष आहे, त्यामुळे हा संघर्ष थांबवणं त्यांच्यासाठी कठीण आहे, असं ट्रम्प यांनी या चर्चेनंतर वार्ताहरांना सांगितलं होतं. झेलन्स्की यांनी लाखो लोकांचा जीव धोक्यात घातला असून ते तिसऱ्या महायुद्धाला कारण ठरू शकतात, असं ट्रम्प म्हणाले. दरम्यान, वोलोदिमीर झेलेन्स्की उद्या होणाऱ्या युरोपियन सुरक्षा परिषदेसाठी ब्रिटनमधे पोहोचले आहेत. तिथं ते ब्रिटनचे प्रधानमंत्री केर स्टार्मर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील. इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्याशीही झेलेन्स्की चर्चा करतील.

**<><><><><>**

आय सी सी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेत आज ‘ब’ गटातल्या शेवटच्या साखळी सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडनं ३८ षटकं आणि २ चेंडूत सर्वबाद १७९ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल दक्षिण आफ्रिकेनं सामन्याचं शेवटचं वृत्त हाती येईपर्यंत २९ षटकात ३ बाद १७५ धावा केल्या आहेत. दरम्यान, ‘अ’ गटातला शेवटचा साखळी सामना उद्या भारत आणि न्यूझीलंड संघांमध्ये खेळला जाणार असून या दोन्ही संघांनी आधीच उपांत्य फेरी गाठली असल्यानं हे दोन्ही संघ उद्याचा सामना अंतिम फेरीचा सराव सामना म्हणून औपचारिकरित्या खेळण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर सुरु असलेल्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात आजच्या चौथ्या दिवसअखेर विदर्भ संघाच्या दुसऱ्या डावात ४ बाद २४९ धावा झाल्या. विदर्भानं २८६ धावांची आघाडी घेतली आहे. खेळ थांबला तेव्हा करुण नायर नाबाद १३२ धावांवर खेळत होता.

**//<><><><><>//**